श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

[व]र्ष ४ थें.] अ[श्वि]क चैत्र शके १८४८ [ अंक १ ला.

नळिनीदळगत जळमतितरळम् । तद्वज्जीवनमतिशय चपळम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ४३३-४ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ६४७-६ |


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा ० असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्ने मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकं कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत णाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतो व या जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्ये आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही कर यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रें बी. बी. सी. आय्. रे

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।=व्ही. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

पूर्वींच्या अंकांत व्ही. पी. नें रु. ३॥= चुकून छापलें गेलें. तसेंच ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु. ३॥। ची व्ही. पी. चुकून गेली, त्यांचे -।- अ कडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून दे

# श्रीदत्त चित्साइराजायनमः

सा. न. वि. वि. गत सालच्या श्रीसाईलीलेचा अंक ६ यांत वचन दिल्याप्रमाणें श्रीबाबांनीं कावजी पाटलासंबंधानें केलेल्या अप्रतिम लीलेचें एक छोटेसें १३१ पद्यांचें आख्यान रचून आपणाकडे पाठवीत आहें. त्यास आपल्या विबुधमान्य श्री साइलीलेच्या एखादे अंकीं स्थान मिळेल अशी उमेद आहे. कवित्व करण्याची संवय नसल्यामुळें रचना ओबडधोबड व सदोष असणें अगदीं साहजिक आहे. तरी सहृदयवाचक हंसक्षीर न्यायानें महाराजांचे अंतरसाक्षित्व, त्रिकाल ज्ञान, "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं" या गीतावचनाप्रमाणें प्रत्येक प्राणीमात्राशीं वागण्याची बाबांची अलौकिक हतोटी, अश्रद्धभक्तासही त्याचें मनोगत तिसऱ्याच्याच मुखांतून काढून त्यास आपल्या अंतरसाक्षित्वाची खूण पटवून देण्याची अनुपमेय शैली, प्रिय किंवा अप्रिय मनोगत ज्याचें त्यासच कळावें व इतरांस ते बोल अर्थहीन वाटावे ही यांची अद्वितीय खुबी, भावी अनर्थ सूचना, अनर्थांतून बचावण्याचा मार्ग, सूचनेप्रमाणें न वागल्यास त्याचें प्रायश्चित्त, दिसण्यांत निरर्थक पण तत्वतः अर्थपूर्ण अशा गोष्टी सांगून त्याचें इष्ट किंवा अनिष्ट भविष्य कथन करण्याची यांची विलक्षण युक्ति वगैरे गोष्टींच्या अर्थाकडे व बाबांच्या लीला-नाटकाकडे व त्यापासून मिळणाऱ्या बोधामृताकडे, त्यांच्या उदार अंतःकरणाकडे व भक्त-वात्सल्याकडे लक्ष देऊन निःसत्व गोष्टींचा त्याग करतील अशी त्यांचे जवळ सविनय प्रार्थना आहे. कावजीचे मनांत प्रथम बाबांबद्दल श्रद्धा होती; पण पुढें ती मावळून तिचे जागीं अश्रद्धा उत्पन्न झाली. व त्या अश्रद्धेमुळेंच बाबा त्यास जवळ येऊं देईनात. पुढें त्याचे इच्छेप्रमाणें त्याचें मनांतीलही यांनीं तिसऱ्याचे तोंडून वदविलें व वणीदेवी कशी आहे, ती आणल्यापासून काय अनर्थ होईल हें गोष्टरूपानें सांगून आपला वडिलार्जित दगड-धोंडाच मंदिरांत बसविणें श्रेयस्कर आहे असें सांगितलें. तरी तीच देवी बसविल्यास काय हरकत आहे ? म्हणून पुनः पुन्हा विचारल्यावर बाबांनीं निर्वाणीचे शब्द सांगितलें. परंतु ही गोष्ट कावजीस पटेना. म्हणून त्यानें आपले ढोंगी

गुरूकडून वणीदेवीच आणण्याचा प्रयत्न केला. परंतु सदर देवीच्या प्राण-प्रतिष्ठेबद्दल अंतःकरण विदारणाऱ्या अटींचा जेव्हां कावजीस त्याचे गुरूकडून निरोप आला व गुरूच्या गांवीं देवी जातांच तेथें प्लेग उत्पन्न होऊन मनुष्यहानी फार झाली हें लक्षांत येतांच कावजी संतापला. त्याची त्याचें गुरूवरील श्रद्धा उडाली, व त्यानें पूर्वींचेच दगड धोंडे मंदिरांत बसविले. हा अनुभव येण्यास त्यास दोन वर्षें लागलीं. वणीची नाहीं तरी दुसरी एक देवी आणून कावजीनें त्याच देवांत बसविली. परंतु त्यामुळें कावजीवर प्राणसंकट आलें. त्याचें प्रायश्चित्त तर त्यास मिळालेंच. पण बाबांनीं संकटांतून त्याचा प्राण वांचविला. अशा ह्या लीलेचें व लीलानाटक करणाऱ्या श्रीसाई जगदीश्वराचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच.

श्री.

## कावजी–लीलाख्यान.

### शार्दूलविक्रीडित.

( नमन )

साक्षान्निर्गुण वस्तु, सांडुनि जगत्काया विराटा परा।
लीलाविग्रह घेउनी भुवि असे आली, स्वरूपा वरा।
जी वाडी–अलकेव–शीरडि मधीं, ग्यां देखिली सुंदरा।
ती श्रीदत्त–चिदीश–साइ जननी मी वंदितों सादरां ॥ १ ॥

### आर्या

( कावजीचें वस्तीस्थान )

जिल्हा ठाणें, डहणू तालूका, त्यामधीं " महालक्ष्मी "।
ग्रामीं प्रसिद्ध नांदे देवी मन–मोहिनी–महालक्ष्मी ॥ २ ॥

---

१ परब्रह्म २ नरसोबाची वाडी ३ आळंदी ४ ज्ञानेश्वर

तद्ग्रामाद्वय क्रोशीं राहे पाटील कावजी कोळी ।
ग्रामीं निकावली त्यां, दक्ष जसा भक्ष्य-बंधनीं कोळी ॥ ३ ॥
त्याच्या पुण्य पित्यानें ग्रामासंनिध तटिन्यु पौकंठी ।
प्रस्तर-देवा स्थापुनि, पूजी, परमार्थ-मार्ग आकंठी ॥ ४ ॥

( त्यानें बांधिलेलें मंदीर व हेतु. )

पितुरंतकाल नंतर वाढवि पाटील शिरिं जटाभार ।
प्रातःस्नान करूनी अर्ची तो पितृदेव संभार ॥ ५ ॥
त्या देवासंनिध मग मंदिर लघु एक कावजी बांधी ।
पतितान्य देश देवी त्यामाजीं स्थापनस्पृहा बांधी ॥ ६ ॥
परि कश्चित्संताज्ञेविण श्रेयस्कर नसेचि तें करणें ।
निग्रह दृढ मनिं ऐसा कावजिच्या, वश जया सदा करणें ॥ ७ ॥

( माझें व कावजीचें बोलणें. )

झाली पंचदशाब्दें गेलों असतां निकावली गांवीं ।
पाटील वदे वाटे, शुभ वार्ता कीं तुम्हांस सांगावी ॥ ८ ॥

## दिंडी.

श्रवण सुभगा श्रवणार्थ शुभा वार्ता ।
पडे श्रवणां कैं, जल मुखीं तृषार्ता ।
सांग बोले मी, झडकरी बोल बापा ।
सत्य सांगे बा व्यर्थ नको थापा ॥ ९ ॥

---

१ जाळ्यांत २ नदी ३ कांठाजवळ ४ कंठीत असे ५ राशी ६ दुसरे देशांत पडलेली ७ इंद्रियें. ८ बारा वर्षें,

## भुजंगप्रयात.

( कावजीची शंका )

पुसे कावजी साधुच्या दर्शनाचा ॥
कधीं जाहला लाभ कीं स्पर्शनाचा ? ॥

म्हणें मी, नसे जाग्रती माजि कांहीं ॥
परी दीधला स्वप्निं संतादि कांहीं ॥ १० ॥

अहो स्वप्निच्या दर्शना सत्यमानी ॥
असा जो असे तो न सत्याभिमानी ॥
वदा स्वप्निचा लाभ तो काय कामा[1] ॥
करी शांत का मृद्[2]भू-[3]काय [4]कामा ॥ ११ ॥

## द्रुतविलंबित.

( माझें उत्तर )

तव विचारदिशा रुचली मना ।
परि पुरेल कशी मनकामना ।
जरि घडे शुभ दर्शन जाग्रती ।
तरिच होय खरी हृदिं जाग्रति ॥ १२

## द्रुतविलंबित.

( संत नमन )

मन रमे, न[5]रमे, सुजनां-पदीं ।
सुजन[6]नता जन,तारि भवा-पंदीं[7] ।

१ उपयोगाला २ मातीच्या बायकोचें ३ शरीर ४ भोगेच्छा. ५ मृदु अभिमानरहित होतें. ६ साधुसंत ७ संसारसंकटांतून.

त्रिदिवं संत वसंत मनोलते[3] ।
नमन त्यां, मन त्यां विनमोलते[4] ॥ १३ ॥

### साकी.

( कावजीचें भविष्य. )

अल्पावधि प्राक्स्वप्निं एकदां शुचितम संतासंगे ।
देखियलें म्यां तुम्हा नाहतां तद्वचनामृत गंगे ॥
मम मन अति हर्षे । सत्वरि दर्शन-घन वर्षे ॥ १४ ॥

तुम्ही यापरी स्नान सुखासी घेत बैसलां खोली ।
साधु गमे मज अर्पण करण्या योग्य बिल्व लाखोली ॥
नाटक देवाचें । नानृतं सत्यंक[6], दे वाचे ॥ १५ ॥

### साकी

" तुम्हासि होइल जाग्रतिमाजीं एका संतजनाचें ।
दर्शन षण्मासांचे आंतचि " सांचें पण वचनाचें ।
अंतरिं तुम्ही माना । सांडुनि विकल्प नाना ॥ १६ ॥

### कामदा.

( कावसजी विनंति )

परि करी जरा विनति नरवरा ।
मम तुम्ही खरी स्मृति मनीं धरा ।
साधु दर्शना जाल ज्या दिनीं ।
न्या मला सवें सत्य त्या दिनीं ॥ १७ ॥

---

१ देव २ वसंतऋतु ३ मनरूपी वेलीस ४ साधुसंत ५ न+अनृत=खोटें ६ ब्रह्मदेव.

## द्रुतविलंबित.

( माझें उत्तर )

वचन कोळ्मिुखांतुनि यापरि । जंव निघे मम चित्त सुखावरी ।
स्मृति धरीन अगत्य बुवा मनीं । मन असो रत नित्यचि वामनीं ॥१८

## शिखरिणी.

( माझ्या बंधूचें पत्र )

बुवाच्या वाचेतें श्रवण करुनि मी परतलों ।
प्रपंचाच्या कार्यी पुनरपि हि सांटोप रतलों ॥
पुढें मद्‌बंधूनीं त्वरित लिहिलें कीं मज अहा ।
असे कोणी " साई " परम मुनि योगेश्वर महा ॥ १९ ॥

## ओंवी

नानासाहेब चांदोरकर । इकडे आले असति नरवर ।
प्रांताच्या अधिकारावर । सज्जन थोर वदती त्यां ॥ २० ॥

## मंदाक्रांता.

" साई साई" वदत वदनीं नित्य प्रत्येक कामीं ।
वाटे आहे गुरु कुणि तयां " साई " या धन्य नामीं ।
ठाणें प्रांतीं नुकति बदली जाहलीसे तयांची ।
घ्यावी त्यांची जरुर तरि हो एकदां भेटि यांची ॥ २१ ॥

## ॥ पंचचामर ॥

( माझी व नानासाहेबांची भेट. )

मला तयासि भेटण्या सुवर्ण संधि दीधली ।
अनाथसें त्रिशूलिनें, मियां हि तीच साधिली ।

१ वरूं लागलें २ वामनावतारी परमात्मा ३ अभिमानानें.

तया गृहींच जाउनी, नमूनि पृच्छिलें तया ।
कथाल वृत्त साइचें करूनि काय हो दया ॥ २२ ॥

॥ घनाक्षरी ॥

साहेबांनीं कथिली थोडी ।
गोड लीला पुण्य-जोडी ।
सत्संगति जी भवभय तोडी ।
वानूं मी न शके ॥ २३ ॥

पद–( वैशाख मास वासंतिक समय शोभला–या चालीवर )

( माझी नानासाहेबांस विनंति. )

घेऊनि जाल काय मला करुण-सागरा ।
दावाल काय शीघ्र तया भुवन–सुंदरा ॥ धृ० ॥

पाहीन कदा नयनिं पूत-मशिद-मंदिरा ।
साष्टांग कदा नमन घाली शिरडि-शंकरा[1] ।
बोलेल काय मधुर गिरा मजसि-पामरा ॥ १ ॥

नाद्यापि कुणा देखियलें संत-नरवरा ।
संगेच कसें बोलूं तया साइ-गिरिधरा ।
याचिलाशिं शिरडि चला मज सवें जरा ॥ २ ॥ २४ ॥

पृथ्वी.

( नानासाहेबांचें उत्तर )

शिफारस कुणासही शिरडि जावया नालगे ।
बरोबरहि यावया जरूर सोयरे वा सगे ॥

१ शंकर.

समाचि सकलां वदे मधुर [1]वाग्गुरू-माउली ।
नका भिउं तुम्हीच जा करिल ती कृपा-साउली ॥ २५ ॥

## ओवी.

( झालेल्या हकीगतीचें जनुभाऊना निवेदन. )

जनु अण्णा करंदीकर । परामर्षी चतुर तत्पर ॥
माझे मित्र परमहितकर । केलें सकल विदित तयां ॥ २६॥

## मालिनी

( पुन्हां कावजीची भेट व त्याचें कटुवचन. )

पुनरपि मग गेलों भेटलों कावजीला ।
सकल कथन केलें वृत्त त्या खवजीला ॥
प्रखर वचन त्याचें ऐकुनी त्या प्रसंगीं ।
विचलित मन वाटे जाहलें दुष्ट संगीं ॥ २७ ॥

**पद**—झंपा—मला शांत मुनी भासतो—या चालीवर.

( बाबांबद्दल कावजीचा ग्रह. )

नसे सत्य हो साइ तो संतमूर्ति ।
पटेना मनीं तत्शुभा शुभ्र कीर्ती ॥ ध्रु० ॥
फुकट धन वेंचुनी । करणगण खेंचुनी ॥
शिरडिगमनीं न ती होयस्फूर्ति ॥ नसे सत्य० ॥ १ ॥
चपलपण मोडुनी । अचलपण जोडुनी ॥
करिल मन कामना काय पूर्ति ॥ नसे सत्य ॥ २ ॥
वचन तरि जनांचें । असत किंतिक साचें ॥
निवळ भरवशानें जाय कां चित्त आर्ति ॥नसे सत्य०॥३॥२८॥

---

१ वाणी वाचा

### अनुष्टुप्.

( कावजीचें सांगणें. )

स्वप्नीं बोलावणें आलें । तुम्हाला मज ना तसें ॥
म्हणोनी सांगतों ऐका । लाभ जाण्यांत तो नसे ॥ २९ ॥

### वसंततिलका.

( माझें उत्तर )

जें काय वृत्त कळलें तुज सांगियेलें ।
भासें परी उलट त्वां मज टांगियेलें ॥
या गोष्टिचा करि विचार जरा मनाशीं ।
वाटे विकल्प तव रे अज-राम नाशीं ॥ ३० ॥

### घनाक्षरी

होइल जेव्हां आमुचा बेत । शिरडी जाण्याचा निश्चीत ॥
तुज कळवूं, करी, जैसा हेत । असेल तव मनिं गा ॥ ३१ ॥

### हरिणी

( माझी मनःप्रवृत्ति. )

परतुनि गृहीं आलों जेव्हां द्विधा मन होतसे ।
कवण वचनीं विश्वासावें वितर्क करीतसे ॥
वदत शिरडी जावें अण्णा न घ्या अजि संशया ।
दिवस ठरवा, मी येतों त्या कथ निज आशयां ॥ ३२ ॥

---

१ ज्याला जन्म नाहीं असा श्रीरामचंद्र प्रभु. २ शंका. ३ जनुअण्णा रंदीकर. ४ आशय—बेत.

## इंद्रवज्रा.

नक्की करूनी दिन जावयाला । पाचारिलें कावजि पाटलाला ॥
आला परी पूर्वग्रहा न सोडी । वाटे विचारा अघराशि जोडी ॥३३॥

**पद**—" रुचती कां तीर्थ यात्रा या समयीं त्यास ती. " या चालीवर.

( कावजीचा पूर्वग्रह व बाबांची निंदा. )

वचनानें बद्ध झालों म्हणुनी मी येतसें ।
परि येणें व्यर्थ ऐसें मन अजुनी घेतसे ॥ धृ ॥
त्या साईपाशिं नाहीं कांहीं ही गमतसें ।
मजला तो संत आहे ऐसें ना दिसतसे ।
सांगे हो हृदय माझें सत्यचि नानारिसें ॥ १ ॥ ३४ ॥

## भुजंगप्रयात.

( कावजीची व बाबांची तुलना. )

कुठे मक्षिका ती कुठें तो गरुत्मान् ।
कुठे वारिगर्ता कुठे तो सरस्वान् ॥
कुठे दीपिका ती कुठे तो प्र[illegible]वान् ।
कुठे भट्ट शार्मा कुठे तो मरुत्वान् ॥ ३५ ॥
कुठें क्षिप्त कोळी गुणाच्या विवर्तीं ।
गुणातीत साई कुठें चक्रवर्ती ॥
कुठें कोळि तो इंद्रियेच्छा[12]नुवर्ती
कुठें साई तो आत्मछंदानुवर्ती[13] ॥ ३६ ॥

---

१ पालक. २ न+अनारिसें=निराळें नाहीं. ३ गरुड. ४ पाण्याचें डबकें. ५ समुद्र. ६ दिवटी. ७ सूर्य. ८ शामभट. ९ इंद्र. १०-११ त्रिगुणाच्या भोवऱ्यांत पडलेला. १२ इंद्रियांच्या इच्छेनुसार वर्तन करणारा. १३ परमात्मेच्छेनुरूप.

क्व तत्माज्ञ कोळिः क्व सर्वज्ञ साई ।
क्व तन्मर्त्य जंतु : क्व चामर्त्य ईशः ॥
अहो निंदितस्तेन चैवं विधोऽपि ।
नुपैक्षत्कदा तं सनाथाधिनाथः ॥ ३७ ॥

**अर्थः**—अत्यंत अज्ञानी असा कोळी पाटील कोणीकडे व सर्व जाणणारा साइनाथ कोणीकडे, मृत्यूला वश असलेला हा प्राणि कोणीकडे व ज्याला मृत्यु नाहीं असा परमात्मा कोणीकडे पण मजा ही कीं अशा प्रकारें त्यानें त्या साइब्रह्माची निंदा केली असतानांही सनाथाचाही नाथ अशा साईनें मात्र त्याची कधींही उपेक्षा केली नाहीं.

**दिंडी.**

वाट धरिली श्री-साइच्या पुराची ।
गर्दि उसळे मनिं विविध-विचारांची ॥
पातलों मग कोपरग्राम क्षेत्रीं ।
गांगतीरीं भेटले कुटिल क्षेत्री ॥ ३८ ॥
साइश्रीच्या वल्गना करित नाना ।
श्रवण करुनी कावजी करि तनाना ॥
वृत्ति ऐसी रे भट्ट जे तटाकीं ।
समज केली परि पूर्वग्रह न टाकी ॥ ३९ ॥

**कामदा.**

( श्री गोदावरी जलवर्णन व नमन. )

गौतमी जलं शुद्ध निर्मलं । परम भूत्तदात्यंत शीतलं ॥
बाह्यंतरं प्राणिनां मलं । नित्यनाशकृच्चाल्पचंचलं ॥ ४० ॥

**अर्थः**—प्राण्यांच्या अंतःकरणांतील पातक व बाह्य मल यांचे निरंतर नाशन करणारें असें तें गोदावरीचें शुद्ध व स्वच्छ पाणी त्यावेळीं कसी वेगवान् परंतु अत्यंत थंड होतें.

### शालिनी.

साईकृष्णांघ्रिच्युतं गांगवारि । हृद्यं स्वादु स्नान योग्यं भवारि ।
प्रातःकाले तत्र नत्वा च स्नात्वा । उत्साहेन प्रस्थिताः शीरडीं श्रीं॥४१॥

**अर्थः**—साइविष्णूच्या चरणापासून निघालेल्या गोदावरी गंगेचें पाणी अंतःकरणाला आनंद देणारें मधुर, स्नानास योग्य, व संसारताप नाहींसें करणारें अशा त्या उदकास आम्हीं सकाळीं वंदन करून त्यांत न्हालों व आनंदानें श्री शिरडीस जाण्यास तेथून निघालों.

**पदः**—ब्रम्ह पाहिलें या चालीवर.

( बाबांचें प्रथम दर्शन ).

साइ पाहिलें, अहाहा, ब्रम्ह पाहिलें ॥ धृ ॥ चाल ॥
इकडुनि तिकडे चालत असतां, लेंडीवरि दिसलें ॥
अहाहा लेंडीवरि दिसलें ॥ १ ॥
निर्गुण ब्रम्हें सगुण होऊनी, साइरूप धरिलें ॥
अहाहा, साइरूप धरिलें ॥ २ ॥
दर्शन लाभासाठीं जयाच्या, ध्याउनि मुनि थकले ॥
अहाहा, ध्याउनि मुनि थकले ॥ ३ ॥
साइ चिद्घना लेंडिनभावरि निरखुनि मन धालें ॥
अहाहा, निरखुनी मन धालें ॥ ४ ॥ ४२ ॥

### इंद्रवज्रा.

पद्मा[1] स्तवी यच्छुभ पादपद्मा । दासीव सिद्धीगण[2] यस्य सद्मा ।
यत्कीर्ति गाना न समर्थ ब्रह्मा । संवंदिलें तच्छिव साइ-ब्रह्मा ॥४३॥

---

१ लक्ष्मी २ वरीं.

### स्वागता.

घालुनी उडि रथातुनि खालीं । देखिली मशिद वैभवशाली ।
ना मशीद, परि सज्जन आई । साइराज विभुची प्रिय माई ॥ ४४ ॥

### इंद्रवज्रा.

लेंडीवरूनी परतूनि आली । ती ब्रह्ममूर्ती मशिदींत गेली ।
देखावया ज्ञान परा कलेला । उत्सूक हृद्वृत्ति-समूह झाला ॥ ४५ ॥

### भुजंगप्रयात.

अहो पाहतां दिव्य ज्ञानांशुमाली । गमे द्वैत-रात्री समूळा निमाली
अहो श्रीशिवा सांडुनी ईश कालीं । उदेला मशीदीमधें भक्तवाली ॥४६॥

अहो भाग्यराशी, अहो पुण्यराशी । परब्रह्म साक्षाच्चिदानंदराशी ।
अहो तेजराशी अहो शांतिराशी । जगत्पापराशी विनाशी, निराशी ॥४७॥

मशीदीमधें जाहली फार गर्दी । मधें शोभला संसृती क्लेश दर्दी ।
कुणी चेपि पादां कुणी अंग मर्दी । पुढें लागली आमुची शीघ्र वर्दी ॥४८॥

### कामदा

( आमच्याबद्दल माधवरावांजवळ विचारपूस ).

कोण हे उभे असति माधवा । सगुण ब्रह्म तें पुसत तेधवां ।
वृत्त कथियलें भक्त माधवें । परिसिलें मुदा श्री उमाधवें ॥ ४९ ॥

### आर्या

( माझे विचार बाबांचें वचन ).

ज्ञानोमय तेजोमय सर्वज्ञः सर्वसाक्षि परमात्मा ।
कोण आम्ही न कळें कां त्या ? परि लीला करी त्रिलोकात्मा ॥५०॥

---

१ अंतःकरणवृत्तींचा समुदाय २ सूर्य ३ योग्यवेळीं ४ निरिच्छ
५ भवरोग ६ चकित्सक

" मोठे लोक आहाती द्यावें आम्हासि पांचे पंचविस ।
नच देणार, बरें, परि आहे तकरार एक पंचविस ॥ ५१ ॥
सांगितलें लइ दे दे, परि बोलें नाहिं देत आतांची ।
कोठे जातो, देइल, परि अवधी दोन चार मासांची " ॥ ५२ ॥

## पद.

( " उद्धवा शांतवन कर जा " या चालीवर )

( मला पटलेली खूण ).

विश्वांतर साक्षी साई, ऐशी मज खूणचि पटली ॥ धृ० ॥
प्रच्छन्न मानुषी तनुनें, जैसा रवि अंबुदें पटलीं ॥
कीं वैभव लपवी विद्युत् , मेघोदरिं तेजें नटली ॥ चाल ॥
त्रैलोक्य नभीं संचरतो, जीवांतरिं वासहि करतो ॥
लोकांमधिं असूनी नसतो, लीलाद्भुत ! मन्मति खुटली ॥१॥ विश्वां०॥
श्रीदत्त गुरूची मूर्ती, स्वप्नीं जी मजला दिसली ॥
ती हीच ऐशी प्रतिती, मम चित्तीं सुंदर ठसली ॥
वदुं काय मुखानें त्याची, अद्भुत ही करणी असली ॥ चाल ॥
बैसुनी तुरी ये असनीं, संचरे अवस्था तीन्ही ॥
व्यापी जग जैसा वन्ही, सत्ता ती अद्भुत गमली ॥२॥ विश्वांतर॥५३।

## स्रग्धरा

वंदूनी पादपद्मा सुरुचिर, रुपया अर्पिला प्रेमभावें ।
देखोनी बोलती श्री " मज अणिक तूं दोन दे जीवभावें " ॥

१ पांच पंचवीस रुपये किंवा शरीर पंचभूतात्मक २ एक पंचवीस रुपयांची तक्रार आहे. ३ झांकलेले ४ मेघाभ्रामधें ५ चवथी ज्ञानावस्था ६ जाग्रती स्वप्न व शुषुप्ती ७ दोन रुपये.

तैसें त्यां शीघ्र केलें मग वदति पुन्हा " बैस या आसनाशी ॥
अण्णांनीं वंदिले श्रीचरण मग दिला रुपया आसनाशी ॥ ५४ ॥

दिंडी.

वदति " अणखी दे एक तूं रुपाया " ।
भाऊ देती झट, पडति फिरुनि पाया ॥
" बैस येथें " त्या वदति शूलपाणी ।
बुवा वंदी मग चरण जोडि पाणी ॥ ५५ ॥

भुजंगप्रयात.

दिली दक्षिणा कावजीनें रुपाया ।
जरी घेतली, लागली ती रुपाया ॥
सरोषें परी त्या वदे नाथ कोडें ।
उठी बैस जा दूर येथूनि थोडें ॥ ५६ ॥

पद–झंपा.

( कावजीचा पूर्व ग्रह. )

अहा ! जाहली साइची वृत्ति ठावी । धनीका गरीबामधें भेद दावी ! ॥ चाल ॥ जवळिघे कितीका, वदत दे अणीका, दूर बसवि एका, जगातें झुकावी ॥ १ ॥ अहो साइपाशी, नसे सत्य राशी । कितीदां तुम्हाशीं कथा ही वदावी ॥ २ ॥ मम न वचं मं लापा, येतसे फार कोपा, मंतिति तरिहि बापा, काय आणीक द्यावी ॥ ३ ॥ ५७ ॥

---

१ आसना जवळ २ आस+नाशी=आशेचा नाश करणाराला=बाबांना. ३ खुपायास लागली. ४ कौतुकानें. ५ प्रतारणा. ६ आपल्या जवळ बसा म्हणत. ७ आणखी दक्षिणा दे असें कित्येकांना म्हणत.८ खरें नाणें. ९ बोलत. १० अचावाचा. ११ अनुभव.

## द्रुतविलंबित.

( जनूभाऊंची शंका. )

वदति भाउ तदा गुरुमायही । जगतिं दृष्टि समा कशि काय ही ॥
म्हणत मी नच पारख आपणा । ढंगि न द्या इतुक्यांतचि दूषणा ५८

## शिखरिणी.

( माझ्या मनाचें द्वैधीकरण. )

मलाही वाटे कीं भुवन-जननी- साइ चरणीं ।
असावी कां ऐशी तिळभर तरी भेद सरणी ? ।
कधीं भेदा दावी तरणि आणि कां माय धरणी ।
कळावी अज्ञाना परि कशि अहो संतकरणी ॥ ५९ ॥

लावणी–( जाउ नको रे विषया टविची या चालीवर.)

मशीद माइ सोडुनि साठे-साब वाडिया माजी ।
गेलों बापूसाब बिन्हाडीं बोलति जेवा, या, मांजी ॥ ६० ॥

सुंदर भोजन रुचकर सेवुनी जोग आईच्या करिचें ।
गेलों पुनरपी दर्शन घेण्या साइ-रमावर-हरिचें ॥ ६१ ॥

आम्हां दोघें वंदुनि चरणा बसलों जवळचि तेथें ।
पाटिल नमना जातां बोलति, येउ नकोरे जा येथें ॥ ६२ ॥

---

१ जनुभाऊ. २ विनाकारण. ३ पद्धत ४ सूर्य ५ लीलाकृति.६ बापूसाहेब जोगांचें कुटुंब, ज्यांस आम्ही आई म्हणत असूं ७ हातचें.

( पुढील अंकांत समाप्त )

# अध्याय ३८ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

सकल जगदानंदकरा । भक्तेष्ट संपादन तत्परा ॥
चरणाश्रित त्रितापहरा । नमन गुरुवरा तव पाया ॥ १ ॥
प्रणतपाला परमउदारा । शरणागतभक्तोद्धारा ॥
करावया लोकोपकारा । त्वां अवतारा धरियेलें ॥ २ ॥
जयजयाजी द्वैतदलना । जयजयाजी भक्तमनमोहना ॥
जयजयाजी भवापहरणा । जयकरुणाघना गुरुराया ॥ ३ ॥
कोठील भाग्य आलें फळा । जेणें हे चरण पाहिले डोळां ॥
भोगिला समागम सुखसोहळा । गेली ती वेळा परती न ये ॥ ४ ॥
केवळ ब्रह्माची जी मूस । ओतून शुद्ध स्वरूपरस ॥
आकारली जी मूर्ती सुरस । तीच कीं संतावतंस साई ॥ ५ ॥
साई तोचि आत्माराम । तोचि पूर्णानंदधाम ॥
स्वयें अवाप्तसकल काम । करीत निष्काम भक्तांस ॥ ६ ॥
जो सर्व धर्म विधारक । ब्रह्मक्षात्रतेज एक ॥
तयांसह मृत्यूचा घोटक । लक्षण हें त्रोटक जयाचें ॥ ७ ॥
जन्ममरणादि संबंध । तोडी तडतडा जो हे बंध ॥
तया मी जड अंध । साष्टांग वंदन करीतसें ॥ ८ ॥

गताध्यायीं अति आवडी । वर्णिली साईनाथांची चावडी ॥
आतां ये अध्यायीं हंडी । परिसा अखंडीत सुखदायी ॥ ९ ॥

तान्हे बाळ खाऊं जाणें । काय खाऊं तें तें नेणें ॥
दूध वा कवळ लावूनि भरवणें । काळजी ही घेणें मातेनें ॥ १० ॥

तैसीच माझी साई माता । लेखणी लेववूनि माझिये हाता ॥
लिहिवून घेई हा प्रबंध आयता । आवडी निजभक्ताकारणें ॥ ११ ॥

युगायुगाचें सिद्धि साधन । मानव धर्मशास्त्रीं वचन ॥
कृतीं तप त्रेतीं ज्ञान । द्वापरी यज्ञ दान कलीं ॥ १२ ॥

सदा सर्वदा दानधर्म । क्षुधाशांती परम वर्म ॥
अन्न दान नित्य नेम । कर्मांत कर्म हें आद्य ॥ १३ ॥

होतां दोन प्रहरचे बारा । अन्नावीण जीव घाबरा ॥
जैसें आपणा तैसेंच इतरां । जाणील अंतरा तोचि भला ॥ १४ ॥

आचारधर्मा माजी प्रधान । अग्रगण्य अन्नदान ॥
पाहूं जातां तयाहून । कांहीं न आन श्रेष्ठत्वें ॥ १५ ॥

परब्रह्मस्वरूप अन्न । त्यांतून भूतें होती निष्पन्न ॥
अन्नचि जीवें जगाया साधन । अन्नांतलीन अवसानीं ॥ १६ ॥

वेळीं अवेळीं येतां अतिथि । अन्नदानें सुखवावा गृहस्थीं ॥
अन्नाविण जे माघारा लाविती । अचूक दुर्गती आमंत्रिती ॥ १७ ॥

वस्त्रपात्रादिदानीं विचार । अन्नदानीं नलगे आधार ॥
कोणी कधींही येवो दारावर । बरवा न अनादर तयाचा ॥ १८ ॥

ऐसी अन्नदानाची महती । एतदर्थ प्रमाण श्रुती[1] ॥
म्हणोनि बाबाही अन्न संतर्पिती । लौकिकरीती आचरिती ॥ १९ ॥

---

१ तैत्तिरीयोपनिषद् अ० ३

पैसा अडका इतर दान । अपूर्ण अन्नदानावीण ॥
कायसे उडुगण शशीविहीन । शोभे का पदकाविण हार ॥ २० ॥
षड्रसान्नीं जैसें वरान्न । पुण्यांत पुण्य अन्नदान ॥
मुकुट शोभेना कळसावीण । कमल विहीन सर तैसें ॥ २१ ॥
भजन जैसें प्रेमावीण । कुंकुमावीण सुवाशीण ॥
सुस्वरावीण गाण्याचा शीण । तक्र अलवण अस्वादू ॥ २२ ॥
त्यांतही व्याधिष्ट शक्तिहीन । अंध पंगू बधिर दीन ॥
तयांला आधीं घालावें अन्न । आप्तेष्ट जन त्या मागें ॥ २३ ॥
आतां बाबांच्या हंडीची कल्पना । साधारणतः श्रोतयां मना ॥
व्हावी म्हणोनि करितों यत्ना । जिज्ञासुजना प्रीत्यर्थ ॥ २४ ॥
मशिदीचिया अंगणांत । चूल एक मोठी रचीत ॥
वरी विस्तीर्ण पातेल ठेवीत । पाणी तें नियमित घालुनी ॥ २५ ॥
कधीं ' मिठे चावल ' करित । कधीं पुलावा मांसमिश्रित ॥
कधीं कणिकेचीं मुटकुळीं वळित । वरान्नीं शिजवीत डाळीच्या ॥ २६ ॥
कधीं करून कणिकेचे रोडगे । अथवा थापून कणिकेचे पानगे ॥
सोडीत शिजत्या वरणांत अंगें । मुटकुळ्यां संगें हळुवार ॥ २७ ॥
मसाला वाटून पाट्यावरती । स्वयें करीत पाक निष्पत्ती ॥
मुगवड्या करूनि स्वहस्तीं । हळूच सोडिती हंडींत ॥ २८ ॥
स्वर्गादि भुवनाचिया आशा । यज्ञार्थीं करवूनियां पशुहिंसा ॥
ब्राह्मणही सेविती पुरोडाशा । सशास्त्र हिंसा ही म्हणती ॥ २९ ॥
तैसेच मुल्लास आज्ञापून । करऊनि शास्त्रोक्त मंत्रोच्चारण ॥
बाबाही करवीत अजाहनन । विधिविधान पुरःसर ॥ ३० ॥
कधीं मोठी कधीं लहान । हंडीचे या प्रकार दोन ॥
तियेमाजी शिजवूनि अन्न । करवीत भोजन अन्नार्थियां ॥ ३१ ॥

---

१ वरण.

पन्नास जणा पुरेसें अन्न । पुरवी जी ती हंडी लहान ॥
जियेंत शंभर पात्रें जेऊन । उरे जैं अन्न ती मोठी ॥ ३२ ॥
तदर्थ आपण वाणियाकडे । स्वयें जाऊनि ठरवीत आकडे ॥
उधारीची वार्ता न तिकडे । पैसे ते रोकडे हातावरी ॥ ३३ ॥
मीठ, मिरची, जिरें, मिरें । भाजीपाला नारळ खोबरें ॥
स्वयें बाबा आणीत सारें । पूर्ण विचारें ठरवून ॥ ३४ ॥
स्वयें बैसूनि मशीदीतें । जातें मांडूनिया निज हातें ॥
गहूं डाळ जोंधळियातें । बाबानीं तेथें दळावें ॥ ३५ ॥
हंडी प्रीत्यर्थ मुख्य परिश्रम । बाबाच आपण करीत अविश्रम ॥
मसाला वाटावयाचेंही कर्म । करीत कीं परम मनोभावें ॥ ३६ ॥
करावया सौम्य वा प्रखर । चुली माजील वैश्वानर ॥
इंधनें हीं स्वयें खालवर । करीत वरचेवर बाबा ॥ ३७ ॥
डाळ घालुनिया भिजत । स्वयें पाट्यावर वाटूं लागत ॥
हिंग जिरें कोथिंबिर मिश्रित । खमंग बनवीत खाद्य स्वयें ॥ ३८ ॥
तिंबूनिया कणकीचे गोळे । करूनि सव्वा हात वेटोळें ॥
लाटूनिया मग ते सगळें । करींत पोळे विस्तीर्ण ॥ ३९ ॥
जोंधळ्याचें पीठा आंत । पाणी घालूनि प्रमाणांत ॥
करूनियां तें तक्रमिश्रित । आंबीलही करीत हंडींत ॥ ४० ॥
तीही अंबील अवघीयांतें । परमप्रेमें बाबा हातें ॥
वाढीत इतर अन्ना समवेतें । अति आदरें ते समयीं ॥ ४१ ॥
असो हंडी शिजली पूर्ण । ऐसी नीट पारख करून ॥
चुली खालीं उतरवून । मशीदी नेऊन ठेवीत ॥ ४२ ॥
विधिपूर्वक मौलवी हस्तें । फात्या देववून त्या अन्नातें ॥
प्रसाद पाठवीत म्हाळसापतीतें । आणीक तात्यांतें आरंभीं ॥ ४३ ॥

मग तें शेष सकळ अन्न । बाबा वाढीत निज हस्तें करून ॥
गरीब दुबळे तृप्त करून । सुख समाधान पावत ॥ ४४ ॥
ते अन्नार्थी यावत्तृप्ति । अन्न सेविती उल्हासवृत्ति ॥
वरी बाबा आग्रह करिती । घ्या घ्या म्हणती प्रीतीनें ॥ ४५ ॥
काय तयांचें पुण्य गहन । जया हें लाधलें तृप्ति भोजन ॥
स्वयें बाबा ज्यां ओगरिती अन्न । काय ते धन्य भाग्याचे ॥ ४६ ॥
येथें सहज येईल आशंका । प्रसाद म्हणून बाबा लोकां ॥
समांस अन्न ही भक्तां अनेका । निःशंक मनें कां वाटीत ॥ ४७ ॥
तरी या शंकेचें निराकरण । करावया न लगे शीण ॥
जयांस नित्याचें मांसाशन । तयांसिच हें अन्न वाढीत ॥ ४८ ॥
आजन्मांत नाहीं सहवास । तया स्पर्शूं न देती मांसास ॥
कधींही न करिती हें साहस । प्रसादीं लालसा त्यां देती ॥ ४९ ॥
गुरु स्वयें प्रसाद देतां । सेव्यासेव्याचा विकल्प येतां ॥
शिष्य पावे निजात्मघाता । अधःपातातें जाई ॥ ५० ॥
या तत्वाची कोठवर जाण । जाहली अपुल्या भक्तांलागुन ॥
म्हणोनि थट्टा विनोदें करून । बाबा हें आपण अनुभवित ॥ ५१ ॥
ये अर्थीची अल्प वार्ता । आठवली जी लिहितां लिहितां ॥
श्रोतीं परिसिजे स्वस्थ चित्ता । निजहितार्था लागून ॥ ५२ ॥
आली एकदां एकादशी । बाबा वदती दादांपाशीं[1] ॥
को<u>ऱ्हाळ्याहून सागोतीशीं</u> । आणविशी का मजलागीं ॥ ५३ ॥
तदर्थ साईंनी रुपये काढिले । दादापाशीं मोजून दिधले ॥
जातीनें जा आज्ञापिलें । तूंच हें केलें पाहिजे ॥ ५४ ॥
नामें गणेश दामोदर । उपनाम जयांचें केळकर ॥
जन जाणोनि ते वयस्कर । दादाच सर्व संबोधिती ॥ ५५ ॥

---

१ दादा केळकर.

हरि विनायक साठ्यांचे श्वशुर । साईपदीं प्रेम अनिवार ॥
ब्राह्मण ब्रह्मकर्मीं आदर । आचारविचारसंपन्न ॥ ५६ ॥
करितां रात्रंदिन निजगुरु सेवा । धणी न पुरे जयाच्या जीवा ।
तयास या आज्ञेचा नवलावा । नकळे वाटावा कैसेनी ॥ ५७ ॥
जयाचीं गात्रें अविकळ । जया पूर्वाभ्यासाचें बळ ॥
तयाचें मन कधीं न चंचळ । बुद्धीही अचळ गुरुपदीं ॥ ५८ ॥
धनधान्य वस्त्रार्पण । हेंच नव्हे दक्षिणादान ॥
गुर्वाज्ञेचें अनुष्ठान । गुरु संतोषण दक्षिणा ॥ ५९ ॥
काया वाचा मनादिकांची । करी जो कुरवंडी सर्वांची ।
अंतीं जो साधी गुरुकृपेची । प्राप्ती तयाची निजश्रद्धा ॥ ६० ॥
मग ती आज्ञा वंदूनि शिरीं । कपडे करूनि आले सत्वरी ॥
निघाले जाऊं त्या गांवावरी । तंव माघारीं बोलविलें ॥ ६१ ॥
अरे ही खरेदी करावयास । कोणास तरी पाठवीनास ॥
म्हणाले जाण्या येण्याचा त्रास । उगी न सायास करावे ॥ ६२ ॥
मग ती सागोती आणावयास । दादांनीं पाठविलें पांडू गड्यास ॥
इतुक्यांत बाबा वदती दादांस । पहा त्या समयास काय तें ॥ ६३ ॥
पांडू निघाला जावयास । पाहूनि लागला तो रस्त्यास ॥
राहूं दे म्हणती आजचा दिवस । परतवी तयास माघारा ॥ ६४ ॥
असो पुढें एक्या काळीं । आली हंडी बनविण्याची उकळी ॥
चुलीवरी डेग चढविली । सागोती रिचविली तियेंत ॥ ६५ ॥
तांदूळ धुवून टाकिले तींत । यथा प्रमाण पाणी घालीत ॥
लांकडें सारून खालीं चुलींत । बाबा ती फुंकीत बैसले ॥ ६६ ॥
गांव सगळा त्यांना अंकित । कोणीही आनंदे बसता फुंकीत ॥
परी बाबांच्या आज्ञे विरहीत । चालेना हिंमत कवणाची ॥ ६७ ॥

अन्नही रांधून आणावयास । आज्ञाच करण्याचा अवकाश ॥
परम सोत्कंठ साईचे दास । साईच उदास एतदर्थ ॥ ६८ ॥
उदास म्हणणें हेंही नसार्थ । स्वयंपाकीं जया स्वार्थ ॥
तो इतरांतें कष्टवील किमर्थ । अन्नदानार्थ परकियां ॥ ६९ ॥
निजनिर्वाहा पोटापुरी । स्वयें जो मागे मधुकरी ॥
हिंडे तदर्थ दारोदारीं । मागे भाकरी चतकोर ॥ ७० ॥
तोच करावया अन्नदान । सोशील जेव्हां कष्ट आपण ॥
तेव्हांच तयातें समाधान । राहीना अवलंबून कोणावरी ॥ ७१ ॥
शंभर पात्रांचा स्वयंपाक । होईल इतुकें पीठकणीक ॥
तांदूळ डाळ पाहूनि चोख । आणीत रोख बाबा स्वयें ॥ ७२ ॥
स्वयें सूप घेऊन हातीं । वाणियाचे दुकानीं जे जाती ॥
व्यवहारीं चोख असावें किती । जन हें शिकती जयाचेनी ॥ ७३ ॥
वस्तू स्वयें हातीं घेऊन । करित दरदाम कसून ॥
कोणी जाऊं न शके छकवून । गर्व हरून जातसे ॥ ७४ ॥
ऐसा हिशेबीं आव घालिती । पईही न तेथें जाऊं देती ॥
पांच मागतां दहा देती । दाम चुकविती हातोहात ॥ ७५ ॥
स्वयें कामाची मोठी हौस । दुजियानें केलें न चले त्यांस ॥
न धरीं कधीं कुणाची आस । परी न त्रास कवणाचा ॥ ७६ ॥
हें एक तत्त्व बाबापाशीं । होतें जागृत अहर्निशीं ॥
म्हणून या हंडीचें कार्याशीं । साह्य न कोणाशीं मागत ॥ ७७ ॥
हंडीच काय धुनीच्या लगत । सर्पणाचे खोलीची भिंत ॥
पूर्वभागाची तीन चतुर्थ । स्वहस्त रचित बाबांची ॥ ७८ ॥
महादू करी कर्दमगारा[1] । बाबा थापी घेऊनि निजकरा ॥
रचीत विटांच्या थरावर थरा । भिंती उभारावयास ॥ ७९ ॥

---

१ चिखलाचा गारा.

आणीक बाबा काय न करिती । मशीद आपण स्वयें सारविती ॥
हातीं कफनी लंगोट शिवती ॥ आस न ठेविती कवणाची ॥ ८० ॥
हंडींतून येतां वर । वाफा उसळत असतां भयंकर ॥
अस्तनी सारूनि बाबा निजकर । घालूनि खालवर ढवळीत ॥८१ ॥
पाहूनि तपेलें खतखतलें । ढवळण्याचें योग्य झालें ॥
नवल बाबा ऐसिया वेळे । अगाधलीले दावीत ॥ ८२ ॥
कोठें रक्तामांसाचा हात । कोठें तपेलें प्रखर रखरखीत ॥
परी न भाजल्याची खूण यत्किंचित । न भयभीत मुखचर्या ॥ ८३ ॥
जो भक्तांचिया पडतां मस्तकीं । तात्काळ वारी त्रितापसमस्तकीं ॥
तयासीं कैसें दुखवावें पावकीं । महती न ठावकी काय तया ॥८४॥
भिजली डाळ पाट्यावरती । घालुनिया स्वयें निवडिती ॥
स्वयें वरवंटा घेऊनि वाटिती । मुगवड्या बनविती निज हस्तें ॥८५॥
मग त्या हंडींत हळूच सोडिती । खालीं न लागाव्या म्हणुनी घाटिती॥
तयार होतां हंडी उतरिती । प्रसाद वाटिती सकळिकां ॥ ८६ ॥
सकळिकां कां म्हणतील श्रोते । साईबाबा तों यवन होते ॥
मग ऐसिया अधर्माचरणातें । जाइले करविते कैसेनी ॥ ८७ ॥
या शंकेचें एकचि उत्तर । धर्म आणि अधर्म विचार ॥
साईपाशीं हें साचार । निरंतर जागत ॥ ८८ ॥
हंडींतील शिजलेले पदार्थ । घ्यावेत सर्वांनी सेवनार्थ ॥
ऐसा दुराग्रह यत्किंचित । साई न धरीत केव्हांही ॥ ८९ ॥
परी तो प्रसाद व्हावा प्राप्त । ऐसिया सदिच्छें जे जे प्रेरित ॥
तयांची केवळ वासना पुरवित । प्रपंच न करीत केव्हांही ॥ ९० ॥
शिवाय ठावी कोणास ज्ञाती । मशीदीं वसती यवन म्हणती ॥
परी तयांची आचरिती रीती । पाहूनि जाती कळेना ॥ ९१॥

१ विस्तव.

भक्त जयास देव मानिती । जयाच्या तें पदरजीं लोळती ॥
तयाची अवलोकी काय जाती । परमार्थ प्राप्ती धिक् त्याची ॥ ९२ ॥

इहामुत्रीं जो बाणला विरक्ती । विवेक वैराग्य जयाची संपत्ति ॥
काय तयाची पहाणें जाती ॥ परमार्थ प्राप्ती धिक् त्याची ॥ ९३ ॥

धर्माधर्मातींत स्थिती । जयाची शुद्ध आनंदवृत्ती ।
काय तयाची पाहणें जाती ॥ परमार्थ प्राप्ति धिक् त्याची ॥ ९४ ॥

ऐसें हें बाबांचें चरित । मी तों गाई निजसुखार्थ ॥
असेल कोणा श्रवणाची आर्त । पुरेलही भावार्थ तयाचा ॥ ९५ ॥

असो या कथेचें अनुसंधान । राहिलें मागेंच पहा परतून ॥
बाबा दादास अनुलक्षून । वदती अवधान द्या तेथें ॥ ९६ ॥

खारा पुलावा आहे केला । पाहिलास का कैसा झाला ॥
दादानीं उपचारार्थ नावाजिला । होहो चांगला म्हणूनी ॥ ९७ ॥

दादा पुराणभक्त वरिष्ठ । स्नान संध्या नियमनिष्ठ ॥
पाहती सदा शिष्टाशिष्ट । तयां न हें इष्ट वाटलें ॥ ९८ ॥

नाहीं कधीं दृष्टीं देखिला । नाहीं कधीं जिव्हे चाखिला ॥
ऐसियास कैसा म्हणसी चांगला । म्हणती दादाला तव बाबा ॥९९॥

काढ कीरे डेगीचें झांकण । पहा कीं आंत हात घालून ॥
मग स्वयें तयांचा हस्त धरून । खुपसिती आंतून डेगीच्या ॥१००॥

पुढें म्हणती हात काढ । पळा घे हा ताटांत वाढ ॥
सोवळ्याची न धरी चाड । उगीच बाड मारूं नको ॥१०१॥

संत म्हणतील शिष्यास बाट । कल्पनाच ही आधीं अचाट ॥
संत कृपेनें भरले घनदाट । तयाची वाट त्यां ठावी ॥१०२॥

खऱ्या प्रेमाची उठतां लहरी । माता ही मुला घेचि मटा करीं ॥
मग जैं बाळ आरोळी मारी । तंव तीच धरी पोटासीं ॥ १०३ ॥

अभक्ष भक्षार्थी जयाचें मन। तयाची वासना करिती शमन ॥
तेंच करी जो मनाचें दमन। तयास अनुमोदन दे साई ॥ १०४ ॥
ही आज्ञापालन मीमांसा। जाई कधीं ती इतुकी कळसा ॥
स्पर्शले जे न आजन्म मांसा। तयांचा भरवसा डळमळे ॥ १०५ ॥
पाहूं जातां वस्तुस्थिति। ऐसिया भक्ता कवणाही प्रती ॥
कधीं न बाबा स्वयें प्रवर्तविती। उन्मार्गवर्ती व्हावया ॥ १०६ ॥
असो सन एकोणीसशें दहा। तया वर्षापूर्वी पहा ॥
योग हंडीचा वरचेवर हा। बहु उत्साहा समन्वित ॥ १०७ ॥
तेथून पुढें मुंबा शहरीं। दास गणूची आली फेरी ॥
साईमहात्म्य कीर्तनगजरीं। कोंदिलें अंतरीं सकळांच्या ॥ १०८ ॥
तेव्हां पासून बाबांची महती। कळूनि आबालवृद्धांप्रती ॥
तेथूनि जन जाऊं लागती। शिरडी न गणती तयांची ॥ १०९ ॥
पुढें पूजा पंचोपचार। नैवेद्याचे नानाप्रकार ॥
सुरू झाले आहार उपहार। दुपारतिपार बाबांस ॥ ११० ॥
वरण भात शिरापुरी। चपात्या चटणी कोशिंबिरी ॥
नानाविध पंचामृत खिरी। अन्नसामुग्री लोटली ॥ १११ ॥
यात्रा लोटली अपरिमित। जो तो दर्शना जाई धांवत ॥
साई चरणीं नैवेद्य अर्पीत। क्षुधार्त संतृप्त सहजेंच ॥ ११२ ॥
होऊं लागले राजोपचार। ढाळूं लागले छत्रचामर ॥
टाळ घोळ वाद्य गजर। भजक परिवार वाढला ॥ ११३ ॥
महिमा वाढला सर्वत्र। गाऊं लागले स्तुतिस्तोत्र ॥
पुढें शिरडी जाहलें क्षेत्र। परम पवित्र यात्रार्थियां ॥ ११४ ॥
तेणें हंडीचें कारण सरलें। नैवेद्य इतुके येऊं लागले ॥
त्यांतचि फकीर फुकरे धाले। उरूं लागलें अन्न बहु ॥ ११५ ॥

आतां कथितों आणिक कथा । परिसता आनंद होईल चित्ता ॥
आराध्य वस्तूचा अनादर करितां । बाबा निजचित्ता अप्रसन्न ॥११६॥
करूनि कांहीं तरी अनुमान । कोणी साईस म्हणती ब्राह्मण ॥
कोणी तया मुसलमान । ज्ञाती विहीन असतां तो ॥ ११७ ॥
नाहीं जयाचें ठावठिकाण । कवण्या ज्ञाती केव्हां जनन ॥
कवण माता पिता हें ज्ञान । कैसा मुसलमान ब्राह्मण वा ११८ ॥
असता जरी मुसलमान । कैसें मशीदींत अग्न्यांराधन ॥
असतें का तेथ तुलसी वृंदावन । घंटावादन साहता का ॥ ११९ ॥
करूं देता शंकस्फोरण । सवादित्र कथा कीर्तन ॥
टाळ घोळ मृदंग वादन । हरिनाम गर्जन मशीदीं ॥१२०॥
असता जरी मुसलमान । मशीदींत स्वयें बैसून ॥
करूं देता का गंध चर्चन । तेथ सहभोजन करिता का ॥ १२१ ॥
असता जरी मुसलमान । असते काय सविंध कान ॥
निजपल्लवचे दाम वेंचून । करिता का जिर्णोद्धारण देऊळाचें ॥१२२॥
धारण करिता का स्नानोत्तर । महावस्त्र पीतांबर ॥
उलट आराध्य दैवतां अनादर । झालिया क्षणभर खपत नसे ॥१२३॥
ये अर्थीची बोधक कथा । आठवली जी लिहितां लिहितां ॥
सादर करितों अतिविनीतता । स्वस्थ चित्ता परिसिजे ॥ १२४ ॥
पहा एकदां ऐसें घडलें । बाबा लेंडीहून परतले ॥
मशीदीसी येऊन बैसले । भक्त पातले दर्शना ॥ १२५ ॥
त्यांतची बाबांच्या बहुप्रीतीचे । होते भक्तवर चांदोरकर साचे ॥
आले भुकेले दर्शनाचे । बिनीवाल्यांचे समवेत ॥ १२६ ॥
नमस्कारोनि साईनाथा । सन्मुख बैसले ते उभयतां ॥
बालल्या असतां कुशळवार्ता । बाबा अवचितां रागावले ॥ १२७ ॥

---

१ धुनीची पूजा अथवा अग्नि होत्र. २ नानासाहेब चांदोरकर.
३ नानासाहेबांचे साडू.

म्हणती नाना तुजकडून । व्हावें कैसें हें विस्मरण ॥
हेंच काय त्वां केलें संपादन ॥ मज सर्वे दिन घालवूनि ॥ १२८ ॥
त्वां जी माझी केली संगती । अखेर तीची हीच का गती ॥
ऐसी कैसी भ्रमली मती ॥ यथा निगुती मज सांग ॥ १२९ ॥
परिसोनि नाना अधोवदन । मनीं विचारिती कोप कारण ॥
होईना कांहींही आठवण । मन उद्विग्न जाहलें ॥ १३० ॥
चुकलें कोठें कांहीं कळेना । कोपास कांहीं कारण दिसेना ॥
परी कांहीं तरी जाहल्याविना । बाबा न कोणा दुखवती ॥ १३१ ॥
म्हणोनि बाबांचे पाय धरिले । बहूतांपरी विनविलें ॥
अखेर नानांनी पदर पसरिले । पुसिलें भरलें का रागें ॥ १३२ ॥
वर्षानुवर्ष माझी संगती । असतां तुझी हे का गती ॥
काय झालें तुझिया मती । बाबा वदती नानातें ॥ १३३ ॥
कोपरगांवीं कधीं आलां । वृत्तांत काय वाटेसी घडला ॥
मार्गांत मध्यें कोठें उतरलां । तांगा हांकिला कीं थेट ॥ १३४ ॥
नवल कांहीं घडलें वाटे । साद्यंत परिसावें ऐसें वाटे ॥
सांग पां झालें काय कोठें । असो मोठें सान वा ॥ १३५ ॥
ऐसें परिसतां नाना उमजले । तात्काळ त्यांचें तोंड उतरलें ॥
जरी बोलावया मनीं शरमले । तरी तें केलें निवेदन ॥ १३६ ॥
लपवालपवी न चले येथ । मनांत केलें हें निश्चित ॥
मग जें घडलें तें साद्यंत । नाना सांगत बाबांतें ॥ १३७ ॥
असत्य चालेना साईप्रती । असत्यें नाहीं साईची प्राप्ति ॥
असत्यें जाणें अधोगति । अंतीं दुर्गति असत्यें ॥ १३८ ॥
गुरुवंचन महा दुष्कृति । पापास नाहीं तया निष्कृती ॥
जाणोनि नाना बाबांप्रति । घडलेलें कळविती साद्यंत ॥ १३९ ॥